# संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती संताच्या प्रबोधनातील सार्वकालिकतेच्या अंगाने

**डॉ. निशा स. नायगांवकर (जोशी)**
कला विज्ञान महाविद्यालय, कु-हा
E-mail- joshinsh123@gmail.com

**सारांश :-**

*संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती संताच्या प्रबोधनातील सार्वकालिकतेच्या अंगाने कोणत्याही वाङ्मयप्रकाराचा विचार करतांना वा त्याचा अभ्यास करतांना त्यातील मूल्यात्मकता आपण लक्षात घेतो. ती जर काळाच्या कसोटीवर उतरत असेल, तर त्या साहित्याची आपण अक्षर वाङ्मयामध्ये गणणा करतो. संत साहित्याकडे पाहिले असता वा त्यातील विचार लक्षात घेतले तर नजरेमध्ये भरते, ती त्यातील सार्वकालिकता बाराव्या शतकापासून मराठी वाङ्मयाच्या निर्मितीला प्रारंभ झाला. तेव्हापासूनच ते आजपर्यंतचे संत विचार पाहिले तर आजच्या सामाजिक वास्तवाच्या संदर्भात ते पउयोगाचेच नव्हे तर गरजेचे असलेले जाणवते. आज विज्ञानाने प्रगती केली जग जवळ आले. पण माणसं दुरावली ही स्थिती आहे. केवळ दुरावली नाही तर आज ती ज्या निसरडया वाटेवरुन चालत आहे, ती धोक्याची आहे. या वाटेवर तोल सावरायचा असेल तर संत विचाराची कास धरली तर जास्त सोयीचे होइल. साहित्यात जसे समाजाचे प्रतिबिंब पडते, तसेच साहित्य हे जीवनधारेला एकप्रकारची प्रेरणा देत असते. संत विचार तर प्रेरणेचा असा स्त्रोत आहे, की भरकटलेल्या जीवननौकेला कीना-याला नेऊन पोहचविते. म्हणून संत विचाराचे केवळ वाचन नव्हे तर मनन व्हावे.*

*आजच्या समाजाचे चित्र असे आहे की, नैतिकतेची कास सोडून वाटचाल करीत आहे. अशा स्थितीत संत साहित्यातून नीतीमूल्यांची जोपासना होऊन ते रुजल्या देखील जाऊ शकतात. 'विश्व रागे झाले वन्ही, संत तोषे व्हावे पाणी' अशी आर्ततेने हाक देणारे संतसाहित्य आजच्या वास्तवाची गरज आहे.*

कोणत्याही वाङ्मय प्रकाराचा विचार करतांना वा त्याचा अभ्यास करतांना त्यातील मूल्यात्मकता आपण लक्षात घेतो. ती जर काळाच्या कसोटीवर उतरत असेल, तर त्यासाहित्याची आपण अक्षरवाङ्मयामध्ये गणणा करतो. संत साहित्याकडे पाहिले असता वा त्यातील विचार लक्षात घेतले तर नजरेमध्ये भरते, ती त्यातील सार्वकालिकता बाराव्या शतकापासून मराठी वाङ्मयाच्या निर्मितीला प्रारंभ झाला. तेव्हा पासून ते आज पर्यंतचे संत विचार पाहिले तर आजच्या सामाजिक वास्तवाच्या संदर्भात ते पउयोगाचेच नव्हे तर गरजेचे असलेले जाणवते. आज विज्ञानाने प्रगती केली जग जवळ आले. पण माणस दुरावली ही स्थिती आहे. केवळ दुरावली नाही तर आज ती ज्या निसरडया वाटेवरुन चालत आहे, ती धोक्याची आहे. या वाटेवर तोल सावरायचा असेल तर संत विचाराची कास धरली तर जास्त सोयीचे होइल. साहित्यात जसे समाजाचे प्रतिबिंब पडते, तसेच साहित्य हे जीवनधारेला एक प्रकारची पेरणा देत असते. संत विचार तर प्रेरणेचा असा स्त्रोत आहे, की भरकटलेल्या जीवन नौकेला कीना-याला नेऊन पोहचविते. म्हणून संत विचाराचे केवळ वाचन नव्हे तर मनन व्हावे.

आजच्या समाजाचे चित्र असे आहे की, नैतिकतेची कास सोडून वाटचाल करीत आहे. अशा स्थितीत संत साहित्यातून नीती मूल्यांची जोपासना होऊन ते रुजल्या देखील जाऊ शकतात. 'विश्व रागे झाले वन्ही, संत तोषे व्हावे पाणी' अशी आर्ततेने हाक देणारी मुक्ताबाई आपल्याला दिसते. आजच्या सामाजिक वास्तवातील मुक्ताबाई आपल्याला दिसते. आजच्या सामाजिक वास्तवातील मुक्ताबाई पाहिली तर तिला कोणापासून कशी मुक्ती पाहिजे आहे हे कळत नाही. उलट तिला जन्मापासून मुक्ती कशी देता येईल हे पाहिले जाते.

या सामाजिकतेला बदलायला सुद्धा संत साहित्य कामी पडू शकते हा विचार ज्या मनोवृत्तीतून जन्माला आला ती मनोवृत्ती बदलली तर सहज शक्य आहे. आपण आपल्या सभोवतालचे चित्र पाहिले तर लक्षात येते की, मुलीचा जन्म म्हणजे पाप वाटते. ‘ स्त्री जन्म म्हणून न व्हावे उदास ’ असे सागणारी जनाबाई आठविल्यावर आजच्या संकुचित विचारधारेची लाज वाटते.

**मुक्ताई :-** अवघ्या बारा-तेरा वर्षाची असणारी मुक्ताबाई चौदाशे वर्षाच्या सिद्धी पुरुषाला- “अरे चांगा चैदाशे वर्ष जगला आणि कोराचा कोराच राहीला ” असे सुनाऊ शकते, ते तिच्या सामर्थ्याने अशा समर्थ विचाराची कास धरली तर मनातील खोटे अहंकार जाऊन, ज्ञानाचा खरा प्रकाश जीवनामध्ये येइल. संत मुक्ताबाई सर्वापेक्षा लहान पण तिने तिच्या कर्तृत्वाने आपले स्थान निर्माण केले. “बोलोनिया येणे वाढविला डांगोरा संताचा सन्मान कळेना तया शीराहून दूेवापाशी काय केले?” अहंकार युक्त भक्तिमुळे नामदेव मुक्ताबाईला लहान वाटतात. मुक्ताबाई म्हणजे संत परंपरेतील एक गोड स्वप्न म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. नामदेवाला आणि सर्व संताना ती मातृस्थानी आहे. तिचे संत परंपरेतील स्थान तिच्या कर्तृत्वाने वरचे आहे. तिचे स्थान काय? हे जर सांगायचे असेल तर चांगदेवांची उक्ती त्यावर प्रकाश टाकु शकते - “ मुक्ताई सांगडी वटेष्वर तारु चांगा पैलपारु उतरला.” आजही अशी मुक्ताई अशक्य नाही, तिला जन्म घेऊदया ती आपले स्थान स्वतःच निर्माण करील, यात तिळमात्र शंका नाही.

*शब्दशस्त्रे झाले क्लेश,संती मानवा उपदेश*
*संती मानवा उपदेश,विश्वपत ब्रम्ह दोरा*
*चिंता क्रोध मागे सारा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा*[1]

ज्ञानेश्वरांना उपदेष करु शकणारी मुक्ताईच होय. मानापमानाच्या खोटया दंभाला आपला भाऊ बळी पडला तर, लहान असून तिने उपदेष केला. आजही हा उपदेष उपयुक्त आहे.

**ज्ञानेश्वर :-** संत हे मध्ययुगीन महाराष्ट्रच्या सामाजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्याचे खरे शिल्पकार होय. पण आज देखील ते दिशा दर्शक ठरतात. संताना असणारी लोकोद्धाराची तळमळ ही कधी कालबाहय होणारी गोष्ट नाही. त्यांनी सांगितलेले विश्व प्रेम हेच पूर्णतेचे लक्षण मानले. विश्वप्रेम असणारा पूर्ण पुरुष जर आज झाला तर ख-या अर्थाने स्वर्ग पृथ्वीवर अवतरेल. सामाजिक अधिकार सामान्य माणसाला मिळवून दिला. हा अधिकार सार्वत्रिक, सार्वकालिक असा होता.

‘रोग जाय दुधसाखरे तरी निंब का पियावा ’ सुलभ भक्ति सांगितली आजही आपण पाहतो की चातकाच्या दृष्टीने काही वेचण्याची दृष्टी व वृत्ती समाजात दिसतच नाही.

*जैसे शारदेचिये चंद्रकले, माजी अमृतकण कोवळे*
*ते वेचिती मने मवाळे, चकोर तलगे*
*तेया परी श्रोता, अनुभवावी हे कथा*
*अति हळुवारपणा चित्ता, आणुनिया*[2]

अशी हळूवारवृत्ती असली तर अशक्य ते शक्य करता येईल ‘ओले मूळ भेदी खडकाचे अंग’ म्हणतात ते काही खोटे नाही. या भक्तियोगाने जसा तत्कालीन कर्माच्या अधीन असलेले ममत्व, अहंता, फलाशा सोडल्यामुळे हा योग अभ्यास योग झाला. तसाच आजही तो गरजेचा आहे. राजकीय धार्मिक सर्वच क्षेत्रात अहंता बोकाळली असून त्यायोगे सद्गुणांची, सद्विचारांची पायमल्ली होत आहे ती वाचेल. बहिरंगापेक्षा अंतरंगाला महत्व दिले तर माणूस वाचविता येईल, जो आज दुरापास्त होत चालला आहे. ज्ञानेश्वर म्हणतात-“पै भक्ती एकी मी जाणे, तेथ साने थोर न म्हणे” ज्ञानेश्वरांना हा अनुभव आला होता. शुद्रतिशु द्रांचे दुःख त्यांनी भोगलेले होते,म्हणुनच या वर्गाची वेदना त्यांना जाणवली. ‘म्हणौनि कुळ जातिवर्ण, अवघेचि गा अकारण’ असे म्हणत गीतेतील हा भाव मराठीमध्ये आणुन अपमानित, दलितवर्गाला एक आध्यात्मिक आश्वासन दिले. ज्ञान हेच सर्व अंधःकारावरचा रामबाण इलाज आहे. हे जाणले, आणि ज्ञानाचा ओघ सामान्यांच्या दारापर्यत आणून सोडला. हे कार्य म्हणजे शब्दानेच नव्हे तर कृतीने केलेली परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल होय.

**संततुकाराम :-** मराठीत बंडाचा झेंडा उभारणारा हा संत -‘न देखवे डोळा ऐसा हा आकांत, परपीडा चित्त दुःखी होते’ केवळ असे म्हणून थांबले नाही तर त्यांनी त्यासाठी उपाय सांगितले - “ होईल तैसे बळ फलित करावे ते खळ, तुका म्हणे त्यांचे पाप नाही ताडणाचे, देव्हा-यावरी विंचू आला देवपूजा नावडे त्याला, तेथ पैजारेचे काम.” तुकारामांनी पुकारलेले हे बंड आजही अन्याया विरुद्ध उभे ठाकायला बळ देते. निर्भय,निडरवृत्ती जोपासण्याचे बाळकडू संत विचार देतात.

'भीत नाही आता आपुल्या मरणा, दुःखी होता जनान देखवे.' अन्याया विरुद्ध लढायचे असेल तर मरणावर उदार व्हायला प्रेरणा देत आहे. शब्द शस्त्र बनून येतात. तुकारामाची पूर्ण कविताच स्फूटरुपात असल्यामुळे आध्यात्मिक तसेच लौकिक जीवनातील अनुभव सत्यांना त्यांनी विशेष महत्व दिल्यामुळे, आजही त्या लोकांना सुखदुःखच्या निरनिराळया भावपातळयांवर अभिव्यक्त होण्याचे सामर्थ्य देते.

*काय करू मी दातारा, काही न पुरे संसारा*
*जाली माकडाची परी, येतो तळा जातो वरी* [३]

तुकाराम आपला उपरोध असा स्वतःवर उलटवतात. कवीने स्वतःवर उलटवलेला हा उपरोध सर्वश्रेष्ठ समजला जातो. तुकारामांचे हे विचार आजही संजीवक असे व नवचेतना देणारेआहेत.

**राष्ट्रसंतः-** सामाजिक वास्तवाच्या पातळीवरुन विचार करतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी लोकशिक्षणाचे आपले अमोघ कार्य साठसत्तर पुस्तकांतून आणि विषेशतःग्रामगीतेतून, तेजस्वीशब्दांमधून, श्रोत्यांना तल्लीन करणा-या खंजिरी भजनातून, व्याख्यानातून, शीबिरातून सेवा मंडळातून लोकांपर्यत पोहोचविले ते अभ्यासले तर आजही केवळ जीवनदर्शनच घडवित नाहीतर, जीवनाला घडविणारी सूर्यप्रभा ठरतात. राष्ट्रसंतांनी दिलेले मूल्यशिक्षण देखील मौलिक व उपयुक्त असे आहे.माणुस द्या मज माणुस द्या, ही भीक मागता मज प्रभु दिसला राष्ट्रसंतांनी 'माणूस' घडविण्याचे स्वप्न पाहिले आणि जन्मभर व्रत जोपासले. आजही आपण विद्यापीठ, महाविद्यालयातून अनेक आयोग, समित्या या मार्फत मूल्यशिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. ती मूल्ये राष्ट्रसंताच्या साहित्यातून प्रकर्षाने प्रकट झालेली आहेत. श्रमप्रतिष्टा, राष्ट्रभक्ती, स्त्री-पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टीकोन, संवेदनशिलता, सौजन्य, राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टीकोन, संताच्या शिकवणुकीचा उपयोग कधीही एका काळाच्या, देशाच्या, धर्माच्या कसोटीत बांधता येत नाही. हा संदेश कृतिशिलता वृद्धीगत करणारा असा आहे. सर्वधर्म-समभाव सांगताना, सामुदायिक प्रार्थनेतून शुभशक्ती जागृतीची शंका-विरहित दृष्टी दिली. देश विकासामध्ये ग्राम केंद्रस्थानी मानले, परिणामी व्यक्तीचे परस्पर द्रोह, द्वेष, गौरवजननिष्ट्तेत लोप पावले. खेडयाकडे होणारे दुर्लक्ष आजही कमी झालेले नाही तर कृषीजीवन आंतरराष्ट्रीय राजकारणाला बळी पडत आहे, नव्हे बळी दिल्या जात आहे. शब्दाला शस्त्र होण्याची नितांत गरज आहे. शब्द शस्त्रासारखे संतानीच वापरले. ढोंगीपुजारी आणि बुवाबाजीकरणा-यांचा त्यांना लहानपणीच अनुभव आला होता.

*दारू गांजादिक पितो, काही पैसा सट्ट्यात जातो*
*काही विभागणीत जातो, व्यभिचाराच्या*[४]
*रात्रभरी गांजा चरस ओढावे, समाधीत पहावे देवा डोळा*
*प्रत्यक्ष भेटतो निशा आल्यावरी, मात आहे खरी सत्यजाणा.*

देवदर्शन घडवितो म्हणणा-या आणि चरस गांजा ओढणा-या अनेक बुवाबाजांच्या भंडाफोड करीत, आदीवासीमध्ये राहून त्यांच्यातल्या अंधश्रद्धा दूर केल्या. आजदेखील आदिवासीमध्ये अंधश्रद्धा, गैरसमजुती असलेल्या आढळतात. अशावेळी त्यांचा आध्यात्मिक मानवतावाद सदाचाराला आधार देणारा असा आहे 'मानवधर्म मनात लाभो, सेवाधर्म जीवाला वाढो' असा ध्यास त्यांना होता. या ध्यासाला धरुन त्यांनी कार्य केले. व त्या विचाराची कास धरण्याची नितांत निकड आहे.

वर्तमानकाळातील तरुणाला राष्ट्रसंताचे विचार प्रेरणा देतात. इतकेच नाहीतर मार्गदर्शन करतात. नीतीच्या मार्गावर वाटचाल करायला दीपस्तंभ ठरतात.

*एक खोदावी जमीन, हे पूजनाहुनी पूजन*
*परिणाम शेकडो व्याख्यानाहून, अधिक तयाचा*
*श्रमिकास जेणे लाभेल अन्न, ते कर्म श्रेष्ठ यज्ञाहून*
*एरव्ही गीतेचे नाव सांगून, भलतेच समर्थन करु नये*[५]

श्रमाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. म्हणजेच श्रमिकाला पोटभर अन्न मिळाले पाहिजे. आजची ज्वलंत समस्या म्हणजे कुपोषणाची दिसते. संपूर्ण भारतभर या समस्येने थैमान घातले आहे. श्रमाच्या प्रतिष्ठेचे तत्वज्ञान गीतेतीलच. पण याच गीतेच्या आडोशाने आज अनेकांचे अध्यात्माचे व्यवसाय सुरु आहेत. त्या विशिष्ट दिवसात आमच्यातील धार्तिकता जागृत होते आणि नंतर पुन्हा आम्ही 'जैसेथे' बनून कुकर्म करीतच असतो. आज आळशी लोकांचा भरणा समाजात वाढत आहे.

*देशात कामाचा उभा डोंगर, दारिद्रय दुःखाचा वाहतो पूर*
*अर्धनग्न, अर्धपोटी लोक अपार, त्यांचे दुःख का न दिसे?*
*परि ज्यांचा होणे आहे साहेब, लोकांवरी कसावया रुबाब*
*नकष्टता इच्छिती आराम खुब, तेचि राहती बेकार*[६]

ऐतखाउ लोकांची, श्रम करण्याची लाज बाळगणा-यां लोकांचीच आज बेरोजगारांमध्ये वाढ झालेली आहे. एकीकडे बेरोजगारांची ओरड सुरु आहे. दुसरीकडे कामगार मिळत

नसल्यामुळे अनेक उद्योग बंद पडत आहेत. या ऐतखाउना कमी परिश्रमात जास्तीतजास्त मोबदला हवा आहे.‘‘जेव्हा पोटाशी भूक लागे, तेव्हाची घरोघरी काम लागे. नाहीतर आळस घेवोनी संगे, खुशाल पडे झोपडीमाजी’’ आज संपूर्ण देशात हीच परिस्थिती आहे. याचे चिंतन करायला तयार नाही. आज दोन वेळचे जेवण मिळतेका? उद्याच्या भविष्यची कोणाला चिंता नाही. खरे सुराज्य येथेच अडलेले आहे. हे सुराज्य यावे असे आपणास वाटत असेल, तर राष्ट्रसंताच्या विचाराचे चिंतन व्हायला हवे. केवळ चिंतन नाहीतर ते कृतीत देखील यायला हवे.

*यासि सर्वचि असती जबाबदार, शक्ती, संपत्ती, विचारप्रचार*
*हे एकहि नाही ताळयावर, म्हणोनी ग्राम ओसाडले*
*श्रीमंता आपुले न वाटे काम, गरिबा उत्पादनाचे नाही प्रेम*
*शिक्षिताही न वाटतो परिश्रम, यानेच आली शिथिलता*[७]

आज आम्ही काय पाहतो तर आमच्या देशात भ्रष्ट्राचार हा शिष्टाचार झाला आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या पेक्षा दुस-याचे दोष दाखविण्याची स्पर्धा करीत आहे. शिक्षिताला परिश्रम करण्याची लाज वाटते आहे. त्याला वाटते शिक्षण घेणा-याने फक्त नोकरी करावी, साहेब बनावे. श्रम करणा-यांवर आपली सत्ता गाजवावी. शारीरिक मेहनत न करता जास्त मिळवावे. कमी श्रमात जास्त मोबदला ही प्रवृत्ती आज समाजात वाढत आहे. या प्रवृत्तीने राष्ट्राचे उत्पन्न घटले. आम्ही परक्यापुढे हात पसरविता.

शेतीची स्थिती पाहिली तर तीही निराशाजनक आहे. आमच्या शेतक-यांना कृषी विद्वानांनी नगदीचे पीक घेण्यास प्रोत्साहित केले, आमची पारंपारिक पिके गेली. कालपर्यत आम्ही आमच्या वातावरणात पोषक असणारे, येणारे पिके घेत होतो. पण आज तंत्रज्ञानाच्या नावाखाली वेगवेगळे प्रयोग करीत आहोत. हे प्रयोग भांडवलदारांच्या पैशावर सुरु आहेत. स्वाभावाविकपणे ते आपल्या फायदयासाठी योजना राबवित आहेत.

आमच्याच शेतात पिकणारा माल मातीच्या भावे या उद्योगपतीना विकत आहोत आणि त्यावर प्रक्रिया झाल्यावर तोच पक्का माल चौपट किंमत मोजून आमचा शेतकरी घेत आहे. ‘कच्चा माल मातीच्या भावे, तो पक्का होता चौपटीने घ्यावे, मग ग्रामजन कैसे सुखी व्हावे? पिकवोनीही ते उपाशी’ हे दृष्य सर्वदूर दिसतआहे. ‘चांभार गावी उपाशी मरे, जोडयासाठी शिक्षित शहरी फिरे, गावी विणकरी फुटाने फाकती, याशी वीमल मलची धोती’ आमचा नेता कसा तर तो जसा उपदेश करतो तसा वागत नाही. आमच्या देशातील पुढारी उपचारासाठी परदेशात जातो.

राष्ट्रसंत म्हणतात आता या देशाच्या नेता पुढा-यांच्या नेतृत्वाला झुगारुन गावे आता स्वयंपूर्ण झाली पाहिजे. आमच्या गावातील जी कलावंत मंडळी असतील त्यांच्या कलेला गावाच्या लोकांनीच प्रोत्साहित करायला हवे. गावातील गरज गावातच भागवायला हवी. सरकारसमोर आता गावाने हात पसरवू नये, आमचा देश आम्हाला बलवान करायचा आहे. ही खूणगाठ मनाशी बांधली तरच आजच्या स्थितीत तरुन जाइल अन्यथा आम्ही जर पुढा-यांपुढे हात पसरवत राहिलो तर गुलाम लाचार होउ. त्यासाठी तुकडोजी महाराजम्हणतात-

*यासाठी प्रत्येक सज्ञान पाहिजे निरोगी, उद्योगी संपन्न*
*तरीच ते गाव आदर्शाचे भूषण, मिरवू शके*
*म्हणोनि प्रत्येकाने आपुल्या गावी, ग्रामीण वस्तूंना चालना द्यावी*
*त्यात सुधारणा हि घडवावी, उन्नति व्हाया कलावंताची*[८]

यासाठी प्रथम गावातील सज्ञान तरुणांनी निरोगी राहने जरुरीचे आहे. गावातील तरुण जर का उद्योगी असेल आणि चारित्रसंपन्न झाला तर गाव आदर्श होतील. गावातील सर्व तरुण उद्योगी झाले तर गावातील तरुण हाताना काम मिळेल परिणामी बेरोजगारी कमी होण्याला साहायभूत होइल. राष्ट्रसंतानी आपल्या विचारधारेतून विश्वशाती व विश्वधर्म प्रतिपादन केला. आज लोक कुटुंब मारुन स्वतःआत्मघात करीत आहेत. भ्रष्ट्राचार, दुराचार, काळाबाजार, अंधश्रद्धा, अंधरुढी, व्यसन खूप वाढली आहेत. समाज चुकीच्या मार्गानी जातो आहे. देशप्रेम विसरत चालला आहे. या अंधारातून जीवनाचा प्रकाश पाहण्यासाठी राष्ट्र संताचे विचार दिपस्तंभ ठरतात.

**गाडगेबाबा** :- संत गाडगेबाबाचे लोक शिक्षणाचे कार्य सर्वपरिचित आहेच. पण वर्तमानात त्याची उपयुक्तता काय? म्हणून पुनःउजाळा दिला तर आजही त्या विचारांची कणभरही महत्व कमी झालेले नाही. विद्येविना अडाणी-समजुतीस बळी पडून समाजाचा अधःपात होतो, हे प्रत्यक्ष अनुभविले आणि मग सामाजिक कळवळया पोटी या सामाजिक अरीष्टांशी आपल्या अमोघ वाणीने जन्मभर झुंज दिली. प्रचंड धर्मशाळा काढल्या, वसतिगृहे बांधली, शिक्षणाची सोय केली. अनाथ

वृद्धांना प्रेमाने सांभाळले. कुष्ठरोग्यांना आश्रय दिला. दुश्काळग्रस्तांना अन्न पुरविले. पशुहत्येवर आघात केले. ‘‘देव देव्हा-यात नसून दीन-दुबळयांमध्ये आहे, जनताजनार्दनात आहे.’’ असे सांगितले. ही वृत्ती नष्ट होत चालली आहे.

रंजल्या-गांजल्यामध्ये परमेश्वर पाहून जनताजनार्दनाची सेवा करण्यात मन गुंतविले तर मनात कुविचार येऊन हातून वाईट कृती होणार नाही. अंगात परीटघडीचे कपडे घालून जनसेवा करायला निघतात.आणि मनात विचार मात्र निर्मळ नाही. अशा वृत्ती आणि वेशाचा ताळमेळ नसणाऱ्या या समाजाला संत गाडगेबाबांनी कृतीने सांगितले. वाचा वीर होण्यापेक्षा कृती महत्वाची, हे समाजाच्या मनीमानसी उतरविले. गाडगे बाबांनी हिंसाबळी, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी गावोगावी प्रचारकार्य केले. गाडगे बाबांचे संघटन कौशल्य अवलंबिने काळाची गरज आहे. बाबांनी कधी अवडंबर करने पसंत केले नाही. साध्या वेशामध्ये देशसेवा केली. किंबहुना ज्या दरिर्द्रीनारायनाची सेवा करायची त्यासाठी वेश देखिल चिंध्या-चिंध्याचा परिधान केला. त्यांनी कधी कुणाला पाया पडू दिले नाही. आशीर्वाद द्या म्हणून जर कोणी म्हटले तर त्याचे उत्तर मोठे मार्मिक असत. ते असे- घरातील तिजोरीच्या चाव्या किती माणसांजवळ असतात? तसेच आशीर्वाद देणारा परमेश्वर हा एकच आहे. इतके करुन कोणी पाया पडला तर त्याच्या पाठीत खराटा बसत असे. उद्देश एकच माझे कार्य पटले असेल तर कृती करा.

निस्पृहता, अनासक्ती, मोह, लोभ या बाबत ते उपदेश करीत असत. गाडगेबाबांची जयंती साजरी केली जाते, खरे तर त्यांची जयंती प्रतिमेच्या पूजनाने होण्यापेक्षाही शिकवण अंगी बानावी. आज राजकीय क्षेत्रात एकदा निवडून आले की, आयुष्यभराची तिजोरी जमा करण्याचा विचार करतात. स्विस बँकेत पैसे जमा करतात. एक गाडगे बाबा होते. ज्यांनी धर्मशाळेमध्ये मुलीने खोली घेतली तर तिला खडसावून पत्र लिहिले की, आपल्या झोपडीत परत जाते. धर्मशाळेतला तांब्या घेण्याची माझी हिंमत नाही मग तुम्ही कोण? गाडगे बाबांची मुलगी म्हणून त्याचा फायदा उठवणार असाल , तर यापुढे ओळख सांगू नका. मुलाला देखील लग्नाच्या दिवशी श्रमदान करायला लावले. अवघ्या साडेसात रुपयात मूलाचे लग्न लावले. असे राजकारणात असेल तर खरे स्वातत्र निर्माण होइल. पण देश गहाण पडला तरी चालेल पण आपली तिजोरी भरली पाहिजे. ही वृत्तीआहे, ‘विश्वस्त हा मालक नसतो, तो विश्वासाने सेवा करणारा सेवक असतो’ असे सांगितले. सध्या तर राजकीय नेता स्वतःला शासकीय तिजोरीचा मालक समजतो. त्यांना गाडगे बाबांचे हे विचार फारच लागू पडतात. देशाला संजीवनी देणारे ठरतात.

बाबा नित्य कर्म करीत राहिले म्हणून ते कर्मयोगी ठरले आणि त्या कर्माचे कर्तृत्व स्वतःकडे न घेता त्यांनी ते जनता जनार्दनाला समर्पित केले. म्हणूनच अहंकारापासून अलिप्त राहिलेले ते कर्मसंन्यासी ठरले. निस्पृहता, अनासक्ती, मोह, लोभ या बाबत माणसे दुस-याला उपदेश करतात, पण त्याच संदर्भात स्वजनाविषयी आंधळे होतात. स्वजनांच्या लाभासाठी त्यांची निस्पृहता कोठे जाते? बाबा स्वजनाविषयी अत्यंत डोळस असत कठोरपणाने नियम, नीती आणि आचार सांगायला स्वजनाविषयी पर्वा करीत नसत.अशाप्रकारे संताचे विचार आजच्या स्थितीत प्रेरणा देणारेअसे आहेत.

## संदर्भ

१) प्रकाश देशपांडे केजकर, ‘संत कविता’,स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. 2006 पृ.186
२) ज्ञानेश्वरी, अध्याय 1 ओवी 56 पा. न. 4 प्रकाशक मो. द. नांदुरकर प्रथम आ. 1976
३) प्रकाश देशपांडे केजकर, ‘संत कविता’,स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. 2006 पृ.165
४) ग्रामगीता, अध्याय 16 ओवी 54 पा. न. 174 प्रकाशक- गोसावी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ प्रथम आ. 2016
५) ग्रामगीता, अध्याय 16 ओवी 54 पा. न. 193 प्रकाशक- गोसावी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ प्रथम आ. 2016
६) उ नि पा. न. 194
७) उ नि पा. न. 195
८) उ नि पा. न. 139

## संदर्भ ग्रंथ

1. राष्ट्रसंत तुडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ्मय-अक्षयकुमारकाळे
2. लोक शिक्षक गाडगेबाबा -रामचंद्रदेखणे
3. लोकोत्तर गाडगेबाबाःजीवनआणिकार्य -द. ता. भोसले
4. तुकारामःव्यक्तित्वआणिकवित्व - संपा.मनोज तायडे, किशोर सानप
5. अमृतकण कोवळे – राम गोविंद आर्वीकर